ePaper

**10 आमदार निवडून येऊ द्या, मुख्यमंत्र्यांचा गणपतीच करतो: बच्चू कडू**



वर्ष - 8 । अंक -82 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- मालिकेपूर्वी ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का
- मयांक यादव भारतीय संघात
- तमिळनाडूच्या मंत्रिमंडळात फेरबदल
- निर्मला सीतारमण यांच्या अडचणीत वाढ


www.mahaenews.com | रविवार, दिनांक 29 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची पुण्यातील काही आमदारांशी चर्चा

# विधानसभेसाठी भाजपचे उमेदवार ठरले?

## अमित शहा यांच्याशी चर्चा झाल्याने आमदारांकडून दावा

। पुणे ।महाईन्यूज

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कोल्हापूर येथील दौऱ्यात पुण्यातील काही आमदारांशी चर्चा करून त्यांना आगामी निवडणुकीसाठी मार्गदर्शन केल्याने त्यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा आहे. शाह यांनी राज्यातील चार विभागांत जाऊन प्रमुख कार्यकर्ते, आमदारांशी संवाद साधून काही जणांना उमेदवारीचा थेट हिरवा कंदील दर्शविला असल्याचा दावा भारती जनता पक्षामधील वरिष्ठांकडून केला जात आहे.**



नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, कोल्हापूर येथे नुकताच शहा यांचा दौरा झाला असून, या विभागातील सर्व प्रमुख नेते, आमदारांशी त्यांनी संवाद साधला आहे. येत्या मंगळवारी (१ ऑक्टोबर) ते मुंबई दौऱ्यावर येणार असल्याचे समजते. नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, कोल्हापूर येथील दौऱ्यात त्यांनी काही गोपनीय बैठका, वैयक्तिक गाठीभेटी घेऊन संभाव्य उमेदवारांना थेट हिरवा कंदील दर्शविल्याचा दावा भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून करण्यात आला आहे. त्यामुळे उमेदवारी मिळवण्यासाठी गाठीभेटी घेत बसण्याच्या भानगडीत न पडता थेट प्रचाराला लागण्यास त्यांना सांगितले आहे. यात पुणे शहरातील तीन आमदारांचा समावेश असल्याची माहिती समजली आहे.

उमेदवारीसाठी १ ऑक्टोबरला मतदानपुणे येथे केंद्रीय भाजपचे निरीक्षक दाखल झाले असून, त्यांनी भाजप कार्यालयात पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्यास सुरुवात केली आहे. भाजपकडून उमेदवारीचा निर्णय घेण्यासाठी कार्यकर्ते, पदाधिकारी यांची मतेही जाणून घेण्यात येत आहेत. केंद्र, प्रदेश, शहर; तसेच विधानसभा स्तरावरील पदाधिकारी असे मिळून प्रत्येक विधानसभा मतदारसंघात ६० ते ७० जणांना आपल्या पसंतीच्या तीन उमेदवारांना मते देण्यास सांगण्यात येणार आहे.

मतदानाची ही प्रक्रिया एक ऑक्टोबरला होणार आहे. मतदानाची प्रक्रिया पार पडल्यानंतर या निरीक्षकांकडून विधानसभा मतदारसंघातील पसंतिक्रमानुसार तीन उमेदवारी नावे प्रदेश भाजपला पाठविण्यात येणार आहेत. त्यानंतर ही नावे प्रदेश भाजपकडून केंद्र स्तरावर पाठविण्यात येतील. पक्षाने केलेले सर्वेक्षणाच्या अनुषंगाने केंद्र स्तरावर या नावांचा विचार होणार आहे. निवडून येण्याची क्षमता असलेल्या उमेदवाराचा प्राधान्याने विचार करण्यात येणार असून, त्यालाच उमेदवारी जाहीर होईल, याबाबत शहर भाजप कार्यालयात शनिवारी झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली आहे.

### शहा यांनी घेतला आढावा

गेल्या बुधवारी शहा कोल्हापूर दौऱ्यावर आले होते. या वेळी पुणे शहरातील भाजपचे आमदार; तसेच प्रमुख कार्यकर्ते थेट कोल्हापूरमध्ये दाखल झाले होते. शहा यांनी कोल्हापूर येथे पुण्यातील आमदारांशी संवाद साधताना त्यांच्या मतदारसंघातील जमेच्या बाजू; तसेच कमकुवत बाजूंबाबत थेट चर्चा केली. त्यांच्याकडे संबंधितांच्या मतदारसंघातील खडान्खडा माहिती होती. कोणता आमदार किती लोकप्रिय आहे, आगामी निवडणूक कोणाला कितपत जड जाऊ शकते, याचाही अंदाज त्यांनी संबंधितांना वर्तवल्याने त्या आमदारांचे 'डोळे' उघडल्याची चर्चा भाजपच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये आहे. शहा यांनी ही प्रक्रिया राज्यातील चारही विभागांत राबवली आहे. काही आमदारांशी थेट चर्चा केली तर काही आमदारांशी त्यांनी गटागटामध्ये संवाद साधला.

---

# रोहित पवारांच्या बुद्धीत शेण आणि डोक्यात किडे...

## आमदार अमोल मिटकरी यांची जहरी टीका

। अकोला ।

महाईन्यूज । प्रतिनिधी।

आमदार अमोल मिटकरी यांनी आमदार रोहित पवार यांच्या खोचक शब्दांत टीका केली आहे. रोहित पवार यांच्या बुद्धीत शेण भरलेले असून डोक्यात किडे पडलेले असल्यामुळे रोहित पवार वेड्याप्रमाणे बालीश वक्तव्य करीत असल्याची खोचक टीका मिटकरींनी केली आहे. आमदार मिटकरी



म्हणाले, रोहित पवारांच्या जातीयवाद आणि मस्तवालपणा नसानसात भरलेला आहे. त्याने अजित पवार यांच्यावर बोलू नये असेही आमदार मिटकरी म्हणाले. लाडकी बहीण ही योजना प्रसिद्ध झाल्यामुळे यांच्या मेंदूतील किडे वळवळले आहेत. त्यामुळे अशा मूर्खाबद्दल बोलणं मला तरी योग्य वाटत नसल्याची टीकाही मिटकरी यांनी केली.

### नेमका वाद काय?

राज्यात विधानसभेचे पडघम वाजू लागले आहे. अशातच प्रत्येक पक्ष आपआपल्या बाजूने चाचपणी करत उमेदवारांची यादी काढत आहे. महायुतीतील मोठा पक्ष असलेल्या भाजपने सुद्धा आता वेगाने तयारी सुरु केली आहे. अशातच भाजपचा अंतर्गत सर्व्हे आला आहे. त्यामध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाला ७ -११ जागा तर शिंदे गटाला १७-२२ जागा आणि भाजपला ६२-६७ मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

### उमेश पाटील यांच्या राजीनाम्याबाबत मीडियातून चर्चा

आमदार मिटकरींनी राष्ट्रवादी काँग्रेस(अजित पवार) गटाचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांच्या राजीनाम्यावरून ही प्रतिक्रिया दिली आहे. उमेश पाटील यांच्या राजीनाम्याबाबत केवळ मीडियातून चर्चा आहे. आमच्या पक्षाचे वरिष्ठ नेते तटकरे साहेब असतील अजित दादा असतील यांना प्रत्येकाचा कान पकडण्याचा अधिकार आहे. उमेश पाटील हे आमचे मुख्य प्रवक्ते आहेत. ते आमच्या पक्षासोबत होते आहेत आणि राहतील असा विश्वासही आमदार मिटकरींनी बोलून दाखविला.

# चंद्रावर जाण्याचा उद्योग पुण्यात होतो आहे

## पुण्यातल्या भाषणात सरकारवर पवारांनी केली जोरदार टीका

। पुणे ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**कोयता गँगची दहशत मध्यंतरीच्या काळात पुण्यात मोठ्या प्रमाणावर पाहण्यास मिळाली होती. त्यासंदर्भातल्या बातम्याही समोर आल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी याच कोयता गँगच्या मुद्द्यावरुन राज्य सरकारवर टीका केली आहे. पुण्यात बोलत असताना ते म्हणाले की विद्येचं माहेरघर अशी पुण्याची ओळख होती.**



आज काल पुण्याचं वैशिष्ट्य काय विचारलं तर लोक म्हणतात कोयता गँग. असं म्हणत त्यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली."आज ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांनी पुण्यात काय केलं आहे? मी देशाच्या कामासाठी दिल्लीला जातो, पार्लमेंटचा सदस्य आहे म्हणून दिल्लीला जातो. महाराष्ट्रातली वर्तमानपत्रं मागवून घेतो, टीव्ही लावतो. तेव्हा काय बघायला मिळतं? पुण्याची चौकशी करतो तेव्हा लोक वैशिष्ट्य काय सांगतात? कोयता गँग. टेल्कोसारखा कारखाना, बजाज सारखा कारखाना, किर्लोस्करांचे कारखाने हे पुण्याचं वैशिष्ट्य, विद्येचं माहेरघर हे पुण्याचं वैशिष्ट्य पण सत्ताधाऱ्यांनी ओळख काय केली आहे? तर कोयता गँग." असं म्हणत शरद पवारांनी महायुतीवर टीका केली. माजी आमदार बापूसाहेब पठारे यांनी शरद पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश त्यावेळी शरद पवार यांनी हे वक्तव्य केलं.कोयता गँग आता भाषणामध्ये कोणी सांगितलं जर अलीकडच्या काळामध्ये नवी पिढी काय करतात मला माहित नाही. कसल्या तरी गोळ्या असतात ते खाल्लं की एकदम चंद्रावर जातो आणि ते चंद्रावर जाण्याचा उद्योग आज पुण्याच्या भागांमध्ये व्हायला लागला आहे. आजचे राज्यकर्ते कोयता गँग असो, ड्रग्ज व्यवहार असो याचा विस्तार पुणे आणि पुण्याच्या आजूबाजूला करत आहेत. यामुळे पुणे आणि पुण्याची नवी पिढी ही उध्वस्त होणार या प्रकारचे चित्र या ठिकाणी दिसते. आज हा प्रकार दिवसेंदिवस वाढत आहे. असंही शरद पवार म्हणाले.शरद पवार म्हणाले, मध्यंतरी वाचलं एक आमदार अशा कामांमध्ये वेगळ्या पद्धतीने लोकांना मदत करतो. आता मी येताना बघितलं मोठे मोठे बोर्ड होते. आमचा दमदार आमदार काय दमदार आहे? चौकशी केली की हा आमदार दमदार आहे म्हणून काय भानगड काय? नाव काय त्याचं? टिंगरे. अरे बाबा तू सांगतो तू कुणाच्या तिकिटावर निवडून आला? त्या वेळेला तुझ्या पक्षाचा नेता कोण होता? त्या वेळेला हा पक्ष कोणी काढला? राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना ही कोणी केली? सबंध हिंदुस्थानला माहित आहे त्या पक्षाच्या वतीने तुला संधी दिली काम करावं अशी अपेक्षा केली.काही तरुण मुलं एका इम्पोर्टेड गाडीतून चालली काय आणि समोरून स्कूटर वर दोन तरुण मुलगा आणि मुलगी जात असताना त्यांना उडवलं काय जागच्या जागेवर त्यांची हत्या काय होते? उद्ध्वस्त होतात आणि अशा वेळेला जे जखमी झाले त्यांना मदत करण्याऐवजी हा दिवटा आमदार पोलीस स्टेशनला जातो. याच्यासाठी मतं मागितली होती? असा सवालही शरद पवार यांनी आमदार सुनील टिंगरे यांना केला. आज काल पुण्याचं वैशिष्ट्य काय विचारलं तर लोक म्हणतात कोयता गँग. असं म्हणत त्यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली."आज ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांनी पुण्यात काय केलं आहे? मी देशाच्या कामासाठी दिल्लीला जातो,टेल्कोसारखा कारखाना, बजाज सारखा कारखाना, किर्लोस्करांचे कारखाने हे पुण्याचं वैशिष्ट्य, विद्येचं माहेरघर हे पुण्याचं वैशिष्ट्य पण सत्ताधाऱ्यांनी ओळख काय केली आहे?

### टिंगरेंना म्हणाले दिवटा आमदार

तर कोयता गँग." असं म्हणत शरद पवारांनी महायुतीवर टीका केली. माजी आमदार बापूसाहेब पठारे यांनी शरद पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश त्यावेळी शरद पवार यांनी हे वक्तव्य केलं.कोयता गँग आता भाषणामध्ये कोणी सांगितलं जर अलीकडच्या काळामध्ये नवी पिढी काय करतात मला माहित नाही. कसल्या तरी गोळ्या असतात ते खाल्लं की एकदम चंद्रावर जातो आणि ते चंद्रावर जाण्याचा उद्योग आज पुण्याच्या भागांमध्ये व्हायला लागला आहे. आजचे राज्यकर्ते कोयता गँग असो, ड्रग्ज व्यवहार असो याचा विस्तार पुणे आणि पुण्याच्या आजूबाजूला करत आहेत. यामुळे पुणे आणि पुण्याची नवी पिढी ही उध्वस्त होणार

# चप्पल स्टँडमध्ये चावी ठेवणं पडलं महागात

## चोरट्याकडून लाखोचे सोनं लंपास, पुण्यातील घटना

।पुणे ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**सदनिकेला कुलूप लावून चावी बाहेरच्या चप्पल स्टँडमध्ये ठेवणे एका नागरिकाला अत्यंत महागात पडले आहे. चोरट्याने चप्पल स्टँडमधील चावी घेऊन भर दिवसा सदनिकेचा दरवाजा उघडून आत प्रवेश केला अन् बेडरूममधील लाकडी कपाटातील लॉकर तोडून पावणेदोन लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून पोबारा केला. घरात चोरी झाल्याने हवालदिल झालेल्या नागरिकाने सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.**



### नेमकं काय घडलं?

ही घटना बुधवारी सकाळी दहा ते सायंकाळी सहाच्या दरम्यान धायरीतील रायकर मळा येथे घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पत्नी व दोन मुलांसमवेत 'निसर्ग हाइट्स सोसायटी'त तक्रारदार राहतात. ते रिक्षाचालक असून, पत्नी व मुलगा नोकरी करतो, तर मुलगी शिक्षण घेत आहे.

घटनेच्या दिवशी सकाळी दहाच्या सुमारास तक्रारदार सदनिका कुलूपबंद करून कामावर जायला निघाले. त्यांनी नेहमीप्रमाणे घराची चावी बाहेरच्या चप्पल स्टँडमध्ये ठेवली. तक्रारदार चप्पल स्टँडमध्ये चावी ठेवतात, याचा सुगावा चोरट्याला लागला. त्याने ही संधी साधून चप्पल स्टँडमधून चावी काढून घराचा सेफ्टी दरवाजा उघडला.

### 1 लाख 80 हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास

त्यानंतर आत प्रवेश करून बेडरूममधील कपाटातील लॉकर तोडले. त्यातून एक लाख ८० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरले. तक्रारदार सायंकाळी सहाच्या सुमारास घरी परतले, तेव्हा घरात चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासण्यात येत असून, या चोरट्याचा शोध घेण्यात येत आहे, अशी माहिती सहायक निरीक्षक सचिन निकम यांनी दिली.

> बोऱ्हाडेवाडी गावातील निवासी क्षेत्र नगर रचना योजना घर कुलूपबंद केल्यावर त्याची चावी चप्पल स्टँड किंवा पायपुसण्याखाली ठेवण्याची सवय अनेक नागरिकांना असते. त्याचा चोरटे गैरफायदा घेतात. त्यामुळे नागरिकांनी घराला चांगले भक्कम कुलूप-लॅच लावावे; तसेच त्याच्या दोन-तीन चाव्या करून त्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीकडे द्याव्यात.
>
> –सचिन निकम,
> सहायक पोलिस निरीक्षक, सिंहगड रस्ता पोलिस ठाणे

## माझी वसुंधरा अभियान 4.0 :

# पिंपरी चिंचवड महापालिकेचा प्रथम क्रमांक!

### आठ कोटींचे बक्षिस, अभियानात एकूण 22,632 स्थानिक संस्थांचा सहभाग

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित "माझी वसुंधरा अभियान" हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिनांक २ ऑक्टोबर, २०२० राबविण्यास सुरवात झाली. "माझी वसुंधरा अभियान ४.०" हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिनांक १ एप्रिल, २०२३ ते दिनांक ३१ मे, २०२४ या कालावधीत राबविण्यात आले होते. माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये राज्यातील ४१४ नागरी स्थानिक संस्था व २२,२१८ ग्राम पंचायती अशा एकूण २२,६३२ स्थानिक संस्थांनी सहभाग घेतला होता.**




गटातील विजेते तसेच, महसूल विभाग व जिल्ह्याच्या एकूण कामगिरी वरून सर्वोत्तम विभागीय आयुक्त, सर्वोत्तम जिल्हाधिकारी व सर्वोत्तम मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची शासनाच्या मान्यतेनंतर निवड करण्यात आली आहे. "माझी वसुंधरा अभियान ४.०" चा अंतिम निकाल खालील प्रमाणे जाहीर करण्यास शासनाने आज मान्यता दिली आहे.

गुणानुक्रमानुसार सर्वोत्तम ठरलेल्या १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राज्यस्तरीय अमृत गटात पिंपरी चिंचवड महानगर पालिकेने प्रथम क्रमांक तर नवी मुंबई महानगर पालिकेने दुसरा तर ठाणे महानगर पालिकेने तिसरा क्रमांक मिळविला आहे. शासन मान्यतेनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय बक्षिसांच्या रक्कमेचे वाटप शासन निर्णयानुसार सदर बक्षिसांसाठी येणारा एकूण खर्च रुपये २२४.५० कोटी (रूपये दोनशे चोवीस कोटी पन्नास लक्ष फक्त) एवढा असून, सदरचा खर्च सुरवातीस महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील निधी मधून करण्यास येणार आहे. माझी वसुंधरा अभियानासाठी आवश्यक निधी अर्थसंकल्पीत झाल्यानंतर त्याची प्रतीपूर्ती महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास करण्यात येणार आहे.

### बक्षिसांच्या रकमेचा विनियोग व कार्यपद्धती

१) बक्षिस रकमेतून घ्यावयाच्या उपाय योजनाः सदर बक्षिस रक्कमेचा विनियोग हा निसर्गाच्या पंचतत्वांचे संरक्षण, संवर्धन व जतन करण्यासाठीच्या उपाय योजना हाती घेण्यासाठी करण्यात यावा. सदर उपाय योजनांपैकी काही उपाय योजना उदाहरणा दाखल खाली नमूद केल्या आहेतः-

१) शहराचे / गावाचे हरित अच्छादन वाढविण्यासाठी करावयाच्या उपाय योजना (जैवविविधतेच्या संवर्धनासह) उदा.:-

(अ) मियावाकी वृक्षारोपण
(ब) अमृत वन
(क) स्मृती वने
( ड) शहरी वने
(इ) सार्वजनिक उद्याने

२ ) जुन्या हरित क्षेत्रांचे संवर्धन आणि देखभाल (जैवविविधतेच्या संवर्धनासह)
३ ) रोप वाटीकांची निर्मिती
४) जलसंवर्धनाचे उपक्रम
५) रेन वॉटर हारवेस्टिंग व परकोलेशन
६) नदी, तळे व नाले यांचे पुनःजिविकरण
७ ) नूतनीकरणयोग्य उर्जा स्त्रोतांच्या वापरास प्रोत्साहन देण्याच्या उपाय योजना
८) सौरउर्जेवर चालणारे / एलईडी चालणारे दिवे
९) विद्युत वाहनांना प्रोत्साहन- चार्जिंग पॉईंट उपलब्ध करून देणे,
१०) माझी वसुंधरा अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांच्या विजेत्यांना बक्षिस देणे

---

## अजित पवारांच्या राष्ट्रवादीला पिंपरी चिंचवडमध्ये शहराध्यक्ष मिळेना

### भोसरीतून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या अजित गव्हाणेंचा राजीनामा

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आगामी विधानसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या असताना एकेकाळी बालेकिल्ला असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस दोन महिन्यांपासून शहराध्यक्षाविना आहे. शहराध्यक्षपदासाठी प्रबळ दावेदार मानले जात असलेल्यांना आमदारकीचे वेध लागले आहेत. त्यामुळे कधीकाळी शहराध्यक्षपद मिळवण्यासाठी रस्सीखेच असलेल्या राष्ट्रवादीत आता मात्र शहराध्यक्ष पद घेण्यास कोणी तयार होत नसल्याचे चित्र आहे.**




बारामतीखालोखल पिंपरी-चिंचवड शहरावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे वर्चस्व होते. सलग १५ वर्षे महापालिकेत राष्ट्रवादीची एकहाती सत्ता होती. 'दादा बोले आणि प्रशासन डोले' अशी परिस्थिती होती. त्यामुळे राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षाला मोठे महत्व होते. या पदासाठी रस्सीखेच होत असे. अजित पवार यांनी भाजपसोबत सरकारमध्ये सहभागी होण्याची भूमिका घेतल्यानंतर संपूर्ण शहर कार्यकारिणी त्यांच्यासोबत राहिली. परंतु, लोकसभेला राष्ट्रवादीचा दारुण पराभव झाल्यानंतर राजकीय भवितव्यासाठी शहराध्यक्षांसह माजी नगरसेवकांनी पक्ष सोडला. भोसरीतून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या अजित गव्हाणे यांनी १६ जुलै २०२४ रोजी राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षपदाचा राजीनामा दिला. समर्थक माजी नगरसेवकांसह राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला.

पक्षाची पडझड रोखण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तत्काळ माजी नगरसेवकांची बैठक घेतली. शहरात येत मेळावाही घेतला. अध्यक्षपदासाठी काही नावे आली आहेत. त्यांपैकी कोणाला अध्यक्ष करायचे याची चाचपणी करत असून, लवकरच अध्यक्षाची नियुक्ती केली जाईल, असे सांगितले. मात्र, त्याला अडीच महिने पूर्ण होत आले. परंतु, अद्याप शहराध्यक्षाची नियुक्ती झालेली नाही. शहराध्यक्षपदासाठी पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे, माजी महापौर योगेश बहल, जगदीश शेट्टी, नाना काटे, भाऊसाहेब भोईर यांची नावे स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सुचविल्याचे सांगितले जाते.

त्यांपैकी बनसोडे विधानसभा लढणार असून, बहल यांना राज्यपालनियुक्त आमदारकी देण्याची मागणी आहे. तर, काटे, भोईर हे चिंचवडमधून निवडणूक लढण्यावर ठाम आहेत. त्यामुळेच त्यांनी शहराध्यक्षपद स्वीकारले नसल्याचे बोलले जाते. विधानसभा निवडणूक तोंडावर असतानाही शहराध्यक्ष निवडला जात नसल्याने पदाधिका-यांमध्ये नाराजी दिसून येत आहे. कर्णधारच नाही तर लढायचे कोणाच्या नेतृत्वाखाली अशा बोलक्या प्रतिक्रिया राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून दिल्या जात आहेत.

### पुतळ्याच्या धातूबाबत व्यक्त केला संशय...

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री असलेल्या अजित पवार यांना राज्यात लक्ष द्यावे लागत आहे. त्यामुळे त्यांचे पुत्र पार्थ यांच्याकडे पिंपरी-चिंचवडची जबाबदारी दिल्याचे दिसते. कारण, पार्थ हे सातत्याने शहरात येऊन संघटनेचा आढावा घेत आहेत. गणेशोत्सवातही शहरातील सर्व मंडळांना त्यांनी भेटी दिल्या. शहराध्यक्ष एक पद असून आमचे सर्व पदाधिकारी शहराध्यक्ष असल्या सारखेच असल्याचे पार्थ यांनी काही दिवसांपूर्वी म्हटले होते.



भूमिका

**यंदाचीही गांधी जयंती नेहमीच्याच उत्साहात साजरी होईल. यंदा तर १५५ वी जयंती, त्यामुळे उत्साह अधिकसुद्धा असू शकतो. चित्रकलेच्या प्रांतात गांधीजींची आठवण होण्यासाठी गांधी जयंतीच उजाडावी लागते, असं काही नाही. गांधीजींची स्मरणीय ठरणारी चित्रं नंदलाल बोस ते अतुल दोडिया अशा अनेक भारतीय चित्रकारांनी केली आहेत.**

# बंदुकीच्या अल्याडपल्याड...

जगभरात गांधीजींचा अहिंसक सत्याग्रहाचा विचार पोहोचलेला आहेच (अमेरिकेत मार्टिन ल्यूथर किंग ज्युनिअर, दक्षिण आफ्रिकेत नेल्सन मंडेला यांनी आपापल्या देश-काळाच्या संदर्भात तो विचार आचरणातही आणल्याचा इतिहास आहे); पण समजा मरीना अब्राहमोविच हिच्यासारख्या सर्बियन 'परफॉर्मन्स आर्टिस्ट'ला गांधीजी समजा माहीतच नसले, तरी १९७४ सालच्या तिच्या 'ऱ्हिदम झीरो' सारख्या कलाकृतीतून गांधीजींच्या कणखर अहिंसक प्रतिकाराचा संदेशच उजळलेला आहे'परफॉर्मन्स आर्ट' ही दृश्यकलावंतानं प्रेक्षकांसमोर जगलेल्या क्षणांमधून साध्य होते आणि कलावंतानं केवळ या क्षणांची मध्यवर्ती कल्पना ठरवलेली असते... पुढं जे काही घडतं ते प्रत्यक्ष घडत जातं, हे ज्यांना माहीत आहे त्यांना मरीना अब्राहमोविचसुद्धा माहीत असेलच. पन्नास वर्षांपूर्वी त्या 'ऱ्हिदम झीरो' या परफॉर्मन्स



कलाकृतीसाठी ती सहा तास प्रेक्षकांसमोर स्तब्ध उभी राहिली (तेव्हा ती युगोस्लाव्हियातली २८ वर्षांची तरुणी होती) आणि शेजारच्या टेबलावर तिनं ७२ विविध प्रकारच्या वस्तू ठेवल्या. लिपस्टिक, परफ्यूम, ब्रेड, वर्तमानपत्र... चाकूचं पातं, कात्री... फुलांचा गुच्छ, आरसा, काडेपेटी, मेणबत्ती, बॅण्डेज... अशी त्या वस्तूंची यादी आता 'टेट गॅलरी'च्या संकेतस्थळावर सापडते. 'या वस्तूंपैकी कोणतीही एखादी वस्तू प्रेक्षकांपैकी एकेकानं येऊन उचलावी, मरीनावर त्या वस्तूचा उपयोग करावा' अशी या 'ऱ्हिदम झीरो'ची मध्यवर्ती कल्पना! त्यातून मरीनाच्या शरीरावर जखमा झाल्या, तिचे कपडे फाडले गेले... पण न डगमगता तिनं हे सहन केलं. याचं भारतीय विश्लेषण असं होऊ शकतं की, महात्मा गांधींच्या अहिंसक प्रतिकाराची ताकद, स्वामी विवेकानंदांच्या कर्मयोगातल्या 'लोखंडी गोळा आदळला तरी अविचल राहणाऱ्या भिंती'ची ताकद मरीनानं दाखवली.ग्वाटेमाला या देशातली रेजिना होजे गालिन्दो हीदेखील परफॉर्मन्स आर्टिस्ट. 'व्यवस्थात्मक अन्याय आणि मानवी हक्कांचं उल्लंघन' हे या रेजिनाच्या परफॉर्मन्समधून वारंवार येणारे विषय. ती दिसते लहानखुरी, पण गेली सुमारे ३० वर्षं तिचं काम सुरू आहे (तिचा जन्म २०७४ सालचा, हा अब्राहमोविच यांच्या संदर्भात पाहिल्यास एक योगायोगच). या रेजिना गालिन्दो यांना २०१७ च्या 'डॉक्युमेण्टा' महाप्रदर्शनात त्यांची कलाकृती सादर करण्याचं निमंत्रण आलं, ते त्यांनी स्वीकारलंही. पण जर्मनीच्या कासेल शहरात दर पाच वर्षांनी भरणारं (आणि केवळ त्याच खेपेपुरतं, ग्रीसच्या अथेन्स या राजधानीतही तितक्याच प्रमाणावर भरलेलं) हे 'डॉक्युमेण्टा' महाप्रदर्शन १०० दिवसांचं असतं. तेवढे दिवस कसा काय करणार परफॉर्मन्स? मग रेजिना यांनी पाच-सहाच दिवस आणि तीन-तीन तासांच्या वेळा ठरवल्या आणि त्यानुसार त्यांनी स्वत:, सदेह सहभाग या 'परफॉर्मन्स'मध्ये नोंदवला... पण या परफॉर्मन्स कलाकृतीचं नेपथ्य त्यांनी असं केलं होतं की, पाहणारे आणि पाहिले जाणारे हे दोघेही सहभागी असतील. एका मध्यवर्ती कल्पनेआधारे जगलेल्या क्षणांमधून जे काही घडलं, त्याचा अनुभव त्या दोन्ही प्रकारच्या सहभागींना मिळेल. वरची वाक्यं चटकन समजणार नाहीत कदाचित; पण त्या कलाकृतीच्या नेपथ्याचं वर्णन समजेल. शिवाय इथं छायाचित्रंही आहेतच. एक चौकोनी खोली- पण तिच्या चारही कोपऱ्यांत काचा- बाहेरून अपारदर्शक आणि आतून काळ्या- या प्रत्येक काचेमधून बंदुकीची नळी रोखली गेली आहे... ही आहे 'जी ३६' या जर्मन रायफलीची नळी. या बंदुकीचा खटका खोलीबाहेरच्या प्रेक्षकाच्या हाती आहे. खोलीत कोण उभं आहे, त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरले भाव बंदुकीच्या नळीसमोर आल्यावर कसे होताहेत, हे बाहेरून पाहता येतंय... पण ते पाहण्यासाठी रायफलच वापरावी लागते आहे. रायफलीला 'लक्ष्य'केंद्रित करण्यासाठी जो डोळा (स्नायपर) असतो, त्यावर लक्ष केंद्रित करून मगच आतलं पाहता येईल, अशी व्यवस्था रेजिना यांनी केली होती.

## प्रासंगिक »

# स्वयंप्रज्ञेचे सुचिन्ह!

***बुद्धिबळपटू हरिका द्रोणावल्लीपुढे आता दोन वैयक्तिक, कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत.***

बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेमुळे पुढे ढकलल्या गेलेल्या आई आणि आजीच्या गुडघेरोपण शस्त्रक्रियांच्या तारखा ठरवून त्या लवकरात लवकर करून घेणे आणि लेक हन्विकाच्या दुसऱ्या वाढदिवसाची तयारी. हरिका 'परफेक्शनिस्ट' असल्याने यात कोणतीही हलगर्जी होणार नाही, याची सर्वतोपरी दक्षता तिला घ्यायची आहे; अगदी तशीच, जशी तिने बुद्धिबळ ऑलिम्पियाडच्या निर्णायक सामन्यातील डावात अझरबैजानच्या गुनाय मम्मदझादाशी पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना घेतली होती. अखेरच्या या अकराव्या फेरीत हरिका पहिल्या पटावर खेळत होती आणि तिचा या डावातील विजय महिला संघासाठी फार महत्त्वाचा होता. नागपूरची दिव्या देशमुख, वंतिका अग्रवाल यांनीही विजय मिळवले, तर आर. वैशालीला बरोबरीवर समाधान मानावे लागले.बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णयश संपादन करून भारताने बुद्धिबळविश्वातील महासत्ता होण्याच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे.

'युनायटेड नेशन्स वर्ल्ड टुरिझम ऑर्गनायझेशन'ने १९८० पासून २७ सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यटन दिवसाच्या रूपाने आंतरराष्ट्रीय उत्सव म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. पर्यटन म्हणजे केवळ फिरणे नसून हा एक अभ्यासही आहे.

# पर्यटन म्हणजे निव्वळ उपभोग नव्हे

नायजेरियन नागरिक दिवंगत इग्नेशियस अमादुवा एटिग्बी यांनी सर्व प्रथम दरवर्षी २७ सप्टेंबर हा जागतिक पर्यटन दिन म्हणून साजरा करण्याची कल्पना मांडली होती. त्यांनीच 'ग्लोबल टुरिझम'चा पहिला 'मास्टर प्लॅन' तयार केला. १९७१ मध्ये इस्तंबूल, तुर्की येथे झालेल्या 'इंटरनॅशनल युनियन ऑफ ऑफिशियल ट्रॅव्हल ऑर्गनायझेशन'च्या कार्यकारी समितीच्या बैठकीला 'नायजेरियन आणि आफ्रिकन शिष्टमंडळां'चे प्रमुख म्हणून एटिग्बी यांनी पर्यटन दिनाचा ऐतिहासिक प्रस्ताव मांडला. तो सर्वसंमतीने पारित झाला आणि वार्षिक जागतिक पर्यटन दिन साजरा करण्यास सुरुवात झाली. संयुक्त राष्ट्र जागतिक पर्यटन संघटना ही आंतरराष्ट्रीय पर्यटनातील एटिग्बीच्या योगदानांपैकी एक आहे. पर्यटन दिवसाचे जनक म्हणून त्यांना 'फादर ऑफ टुरिझम' असेही संबोधण्यात येते. एटिग्बी यांचा मृत्यू २२ डिसेंबर १९९८ रोजी झाला.दरवर्षी पर्यटन दिनी



एक नवीन संकल्पना मांडली जाते. त्या अनुषंगाने सर्व संस्था आपापल्या पातळीवर कार्य करतात. २०२३ ची संकल्पना होती 'पर्यटन आणि हरित गुंतवणूक' आणि यंदाची संकल्पना आहे 'शाश्वत प्रवास, कालातीत आठवणी' अर्थात 'सस्टेनेबल जर्नी, टाइमलेस मेमरीज'. पर्यटकांना त्यांच्यावरील जबाबदारीची जाणिव करून देणे आणि जागरुक पर्यटनाला प्रोत्साहन देणे हे या संकल्पनेमागचे उद्दिष्ट आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिकक्षेत्रात पर्यटकांचे स्थान आणि योगदान किती महत्त्वाचे असते, त्याचा स्थानिक समुदायाला कसा लाभ होतो, या विषयाचे या संकल्पनेतून प्रबोधन करण्यात येणार आहे. विकासाला पूरक असलेल्या घटकांना प्रोत्साहन देण्याच्या भरात पर्यटनाकडे अजिबात दुर्लक्ष होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. आज पर्यटन हा जगातील अनेक देशांच्या आणि भारतातील अनेक राज्यांच्या आर्थकारणातील महत्त्वाचा स्रोत आहे. समुद्राला लागून असलेले देश आणि अनेक राज्ये यांचा ८० टक्के विकास हा पर्यटनावर केंद्रित झाला आहे. अनुभव घेत नाही, डोळ्यांनी निरीक्षण करत नाही तोपर्यंत पर्यटनाचा खरा आनंद आपल्याला घेता येणार नाही. समाजमाध्यमे आपल्याला फक्त माहिती देतात, पण अनुभव देत नाहीत. सामाजिक, आर्थिक प्रभावासोबतच सांस्कृतिक, राजकीय व एकंदरीतच सार्वभौम उद्देश ठेऊनच याचा अभ्यास करण्याकरिता संयुक्त राष्ट्रसंघाने २७ सप्टेंबर हा दिवस 'जागतिक पर्यटन दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय 'शाश्वत प्रवास, कालातीत आठवणी' या संकल्पनेद्वारे घेतला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महात्मा फुले ब्राह्मण विरोधी नव्हते!

## ब्राह्मणाच्या मुलाला महात्मा फुले यांनी दत्तक घेतलं होतंः भुजबळ

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**महात्मा फुले यांच्याबाबत अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी महत्त्वाचं विधान केलं आहे. महात्मा फुले हे ब्राह्मणविरोधी नव्हते तर त्यांनी ब्राह्मण्यवादाचा विरोध केला असं भुजबळ यांनी म्हटलं आहे. सावित्रीबाई फुले या कवयित्री होत्या, ब्राह्मणाच्या यशवंत नावाच्या मुलाला ज्योतिबा आणि सावित्रीबाईंनी दत्तक घेतलं होतं असंही वक्तव्य छगन भुजबळ यांनी केलं.**

"थोर समाजसुधारक क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांनी भारतीय स्त्री शिक्षणाचा पाया रचला. भारतातील स्त्रियांबरोबरच वंचित, शोषित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी कृतीशील लढा उभारला. तत्कालीन रूढीवादी, परंपराप्रिय समाजाचा विरोध पत्करून हे विधायक कार्य त्यांनी केले. तसेच देशाला पुरोगामी विचारांची दिशा दाखवली." नाशिक जिल्ह्यात जो स्मारक लोकार्पण सोहळा पार पडला त्यावेळी छगन भुजबळ यांनी हे वक्तव्य केलं."महात्मा फुले कोट घालायचे म्हणून नलावडे नावाचे एक गृहस्थ होते त्यांनी महात्मा फुलेंवर टीका केली होती. खरंतर वीर सावरकर कोट घालत असत, लोकमान्य टिळक कोट घालत असत. पण टीका फक्त महात्मा फुलेंवर झाली." असं भुजबळ म्हणाले. महात्मा फुले ब्राह्मणविरोधी नव्हते, ब्राह्मण्यवादाचे विरोधक होते. ब्राह्मणांपेक्षा आपल्याच लोकांनी महात्मा फुलेंना जास्त विरोध केला. महात्मा फुलेंनी पहिली शाळा भिडे वाड्यात सुरु केली. भिडे कोण? ब्राह्मण. त्यांना आपल्या लोकांनी विरोध केला. दुसरी शाळा चिपळूणकर वाड्यात सुरु केली. तेदेखील ब्राह्मण होते. असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. महात्मा फुलेंच्या विचारांना विरोध करणारे कर्मठ ब्राह्मण होते त्यापेक्षा आमच्यातले लोक जास्त होते हे आमचं दुर्दैव. त्यांना विरोध अनेकांनी फक्त अंधश्रद्धेतून



केला. महात्मा फुलेंनी सगळ्या क्षेत्रात काम केलं. रामचंद्र गुहा यांनी महात्मा फुलेंचं वर्णन आधुनिक भारताचे शिल्पकार असं केलं आहे. तर बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुलेंना गुरु मानलं होतं. महात्मा फुले यांनी सगळ्या समाजाचा विचार केला, कुठल्याही एका जाती, धर्माचा विचार केलेला नाही. ख्रिस्त, ब्राह्मण, मांग यांना धरावे पोटासी बंधुप्रमाणे हे त्यांनी म्हटलं होतं. असंही छगन भुजबळ म्हणाले.सावित्रीबाई फुले शाळा काढली म्हणून प्रसिद्ध होत्या. बावनकशी, काव्यफुला हे त्यांचे काव्यसंग्रह आहेत. सत्यशोधक कुटुंबात त्यांनी शरीरविक्रय करणाऱ्या महिला, परित्यक्त्या स्त्रियांना आसरा दिला. महात्मा फुले आणि सावित्रीमाईंनी केलेलं कार्य खूप मोठं आहे. यशवंत नावाचा मुलगा त्यांनी दत्तक घेतलं होतं. ते यशवंत पुढे डॉक्टर झाले. हेदेखील छगन भुजबळ यांनी सांगितलं. ३१ मे १९६९ या दिवशी महात्मा फुलेंचा पुतळा पुण्यात बसवण्यात आला. हा पुतळा १९२५ मध्ये बसवण्यात येणार होता. मात्र त्याला त्यावेळी विरोध झाला. महात्मा फुलेंचा पहिला पुतळा मराठा समाजाचे नेते माधवराव बागल यांनी बसवला. त्याचं अनावरण बाबासाहेब आंबेडकर यांनी केलं होतं. हा इतिहासही छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे."थोर समाजसुधारक क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांनी भारतीय स्त्री शिक्षणाचा पाया रचला. भारतातील स्त्रियांबरोबरच वंचित, शोषित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी कृतीशील लढा उभारला. तत्कालीन रूढीवादी, परंपराप्रिय समाजाचा विरोध पत्करून हे विधायक कार्य त्यांनी केले. तसेच देशाला पुरोगामी विचारांची दिशा दाखवली." नाशिक जिल्ह्यात जो स्मारक लोकार्पण सोहळा पार पडला त्यावेळी छगन भुजबळ यांनी हे वक्तव्य केलं."महात्मा फुले कोट घालायचे म्हणून नलावडे नावाचे एक गृहस्थ होते त्यांनी महात्मा फुलेंवर टीका केली होती. खरंतर वीर सावरकर कोट घालत असत, लोकमान्य टिळक कोट घालत असत. पण टीका फक्त महात्मा फुलेंवर झाली." असं भुजबळ म्हणाले. महात्मा फुले ब्राह्मणविरोधी नव्हते, ब्राह्मण्यवादाचे विरोधक होते. ब्राह्मणांपेक्षा आपल्याच लोकांनी महात्मा फुलेंना जास्त विरोध केला. महात्मा फुलेंनी पहिली शाळा भिडे वाड्यात सुरु केली. भिडे कोण? ब्राह्मण. त्यांना आपल्या लोकांनी विरोध केला. दुसरी शाळा चिपळूणकर वाड्यात सुरु केली. असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.

### कोट घालायचे म्हणूनही टीका होत असे

महात्मा फुलेंच्या विचारांना विरोध करणारे कर्मठ ब्राह्मण होते त्यापेक्षा आमच्यातले लोक जास्त होते हे आमचं दुर्दैव. त्यांना विरोध अनेकांनी फक्त अंधश्रद्धेतून केला. महात्मा फुलेंनी सगळ्या क्षेत्रात काम केलं. रामचंद्र गुहा यांनी महात्मा फुलेंचं वर्णन आधुनिक भारताचे शिल्पकार असं केलं आहे. तर बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुलेंना गुरु मानलं होतं. महात्मा फुले यांनी सगळ्या समाजाचा विचार केला, कुठल्याही एका जाती, धर्माचा विचार केलेला नाही. ख्रिस्त, ब्राह्मण, मांग यांना धरावे पोटासी बंधुप्रमाणे हे त्यांनी म्हटलं होतं.

# आनंद दिघेंना मारलं गेलंय : संजय शिरसाट

## दिघेंना डिस्चार्ज देण्यात येणार होता, मग अचानक मृत्यू कसा झाला?

। मुंबई ।
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**धर्मवीर आनंद दिघे यांच्या जीवनावर आधारित धर्मवीर २ हा चित्रपट शुक्रवारी प्रदर्शित झाला. या चित्रपटातील काही दृष्यांमुळे वाद निर्माण झाला आहे. या वादांवर बोलताना एकनाथ शिंदे गटातील आमदार संजय शिरसाट यांनी गंभीर आरोप केला आहे. हे संपूर्ण ठाणे जिल्हा जाणतो, असं ते म्हणालेत. यावरून आता पुन्हा एकदा वाद उफाळून येण्याची शक्यता आहे. आज त्यांनी पत्रकार परिषदेत हे भाष्य केलं.**

आनंद दिघेंना खांद्यावर घेऊन खरंच एकनाथ शिंदे गेले होते का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. त्यावर ते म्हणाले, त्यावेळची परिस्थितीतीच ती होती. आनंद दिघेंना मारलं गेलंय, हे संपूर्ण ठाणे जिल्हा जाणतोय. दुपारी आनंद दिघेंना डिस्चार्ज देण्यात येणार होता. पण अचानक त्यांचं निधन झालं. बोलता चालता निधन झालं? या सर्व गोष्टी कालांतराने समोर येतील. त्या हॉस्पिटलला आग लागली होती. रुग्णालयात असंख्य रुग्ण होते. त्या सर्वांना वाचवायचं काम शिवसैनिकांनी केलं. त्यात एकनाथ शिंदे अग्रस्थानी होते. एवढाच त्या दृष्याचा अर्थ आहे.



पण एकनाथ शिंदे हायलाईट झाले की हे लोक हायपर होतात."एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत संजय शिरसाट म्हणाले, "मी दिघेसाहेबांच्या अपघाताच्या दिवसांपासून पाहिलेलं आणि अनुभवलेलं आहे. तिथे मी गेलेलोही आहे. अपघातानंतरची परिस्थिती मी पाहिली आहे. दिघेंच्या डोक्याला मार लागला नव्हता. त्यांना जिथे मार लागला होता त्यामुळे मृत्यू होण्याचं कारण नव्हतं. मग डिस्चार्ज दिल्यानंतर त्यांना हार्टअटॅक कसा आला? त्यामुळे ठाण्यातील लोक म्हणतात की दिघे साहेबांना मारलं गेलं. दिघे साहेबांचा घात झालाय. इंजेक्शन दिलं होतं? त्यामुळे हृदयात फुगा तयार झाला आणि अटॅक आला. त्यामुळे हार्टवर परिणाम होऊन त्यांचा मृत्यू झाल्याचं अनेकांचं म्हणणं आहे. परंतु, त्या काळात या प्रकरणाची चौकशी व्हायला

### पुतण्या केदार दिघे यांचं प्रत्युत्तर

आनंद दिघे यांचे पुतणे केदार दिघे म्हणाले, "संजय शिरसाट २३ वर्षे काय करत होते? तुम्ही आज म्हणताय की दिघेसाहेबांचा घात झाला आणि संपूर्ण ठाण्याला माहितेय. याचा अर्थ तुम्हा नेत्यांना पहिलं माहिती असेल. मग तुम्ही तोंडं गप्प करून का बसला होतात? तुमचा स्वार्थ काय होता? ज्यामुळे तुम्ही शांत होतात. मी आजही सांगतो, याआधीही सांगितलं आहे आणि यापुढेही सांगेन, या महाराष्ट्राच्या जनतेला साक्षी देऊन सांगतो की मी दिघे साहेबांना अग्नी दिलाय, दिघे साहेबांचा पुतण्या म्हणून कोर्टाची पायरी चढायलाही तयार आहे. पण यासाठी पुरावे घेऊन या."

# तमिळनाडूच्या मंत्रिमंडळात मोठे फेरबदल!

## तुरुंगातून सुटून आलेल्या नेत्यालाही मंत्रीपदाची माळ!

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**तमिळनाडूच्या मंत्रिमंडळात मोठे फेरबदल करण्यात आले असून मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांचे पूत्र आणि उदयनिधी स्टॅलिन यांच्यावर उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. शनिवारी रात्री उशिरा याबाबत माहिती देण्यात आली. रविवारी दुपारी साडेतीन वाजता उपमुख्यंत्री पदाचा शपथविधी सोहळा होणार आहे. तर, दोन दिवसांपूर्वी तुरुंगातून सुटून आलेल्या सेंथिल बालाजी यांनाही मंत्रिमंडळात घेण्यात आले आहे. तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन रवी यांनी राज्य सरकारच्या शिफारशींना मंजुरी दिली आहे.**



सेंथिल बालाजी व्यतिरिक्त द्रमुकच्या तीन नेत्यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे. डॉ. गोवी. चेझियान, थिरू आर. राजेंद्रन आणि थिरू एस.एम.नासर यांचा समावेश झाला आहे. सेंथिल बालाजी यांना गेल्यावर्षी जून महिन्यात सक्तवसुली संचालनालयाने अटक केली होती. यावर्षी फेब्रुवारीमध्ये त्यांनी तामिळनाडूच्या मंत्रिमंडळाचा राजीनामादिला होता. महत्त्वाचं म्हणजे उदयनिधी सध्या तामिळनाडूचे युवक कल्याण आणि क्रीडा विकास मंत्री आहेत. उदयनिधी हे अभिनेते आणि निर्माते असून ते २०२२ मध्ये पहिल्यांदाच आमदार बनले आहेत. पहिल्यांदाच आमदार झाल्यानंतर त्यांना पहिल्या टर्ममध्ये मंत्रिमंडळात संधी मिळाली.

मंत्रिमंडळात त्यांना क्रीडा आणि युवा विकास मंत्री हे खातं मिळालं होतं. दोनच वर्षांत त्यांनी चांगली प्रगती साधली. लोकसभा निवडणुकीच्या काळात त्यांनी जोरदार प्रचार केला होता. लोकसभा निवडणुकीत उदयनिधी यांनी द्रविड मुन्नेत्र कझगम पक्षाचा चांगला प्रचार केला होता. लोकसभा निवडणुकीच्या विजयाचं श्रेय उदयनिधी यांनाही दिलं जातंय. त्याचंच बक्षिस म्हणून उदयनिधी यांच्या गळ्यात उपमुख्यमंत्री पदाची माळ घालण्यात आली आहे.

तामिळनाडूमध्ये २०२६ ला विधानसभेच्या निवडणुका आहेत. उदयनिधी यांच्या लोकप्रियतेचा फायदा घेण्याकरता मंत्रिमडळात मोठे बदल करण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.काही महिन्यांपूर्वी त्यांनी हिंदू धर्माविरोधात भाष्य केलं होतं. "सनातन धर्म हा समानता आणि सामाजिक न्यायाच्या विरोधात आहे. त्यामुळे अशा गोष्टींना विरोध करण्याऐवजी त्यांचं समूळ उच्चाटन करायला हवं. डास, डेंग्यू, मलेरिया आणि करोनासारख्या आजारांना विरोध करता येऊ शकत नाही. त्यांचं उच्चाटनच करायला हवं. त्याचप्रमाणे सनातन धर्माचंही उच्चाटन व्हायला हवं", असं उदयनिधी स्टॅलिन म्हणाले होते.सेंथिल बालाजी व्यतिरिक्त द्रमुकच्या तीन नेत्यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे.

डॉ. गोवी. चेझियान, थिरू आर.राजेंद्रन आणि थिरू एस.एम. नासर यांचा समावेश झाला आहे. सेंथिल बालाजी यांना गेल्यावर्षी जून महिन्यात सक्तवसुली संचालनालयाने अटक केली होती. यावर्षी फेब्रुवारीमध्ये त्यांनी तामिळनाडूच्या मंत्रिमंडळाचा राजीनामादिला होता.

महत्त्वाचं म्हणजे उदयनिधी सध्या तामिळनाडूचे युवक कल्याण आणि क्रीडा विकास मंत्री आहेत.उदयनिधी हे अभिनेते आणि निर्माते असून ते २०२२ मध्ये पहिल्यांदाच आमदार बनले आहेत. पहिल्यांदाच आमदार झाल्यानंतर त्यांना पहिल्या टर्ममध्ये मंत्रिमंडळात संधी मिळाली. मंत्रिमंडळात त्यांना क्रीडा आणि युवा विकास मंत्री हे खातं मिळालं होतं. दोनच वर्षांत त्यांनी चांगली प्रगती साधली. लोकसभा निवडणुकीच्या काळात त्यांनी जोरदार प्रचार केला होता.

लोकसभा निवडणुकीत उदयनिधी यांनी द्रविड मुन्नेत्र कझगम पक्षाचा चांगला प्रचार केला होता. लोकसभा निवडणुकीच्या विजयाचं श्रेय उदयनिधी यांनाही दिलं जातंय. त्याचंच बक्षिस म्हणून उदयनिधी यांच्या गळ्यात उपमुख्यमंत्री पदाची माळ घालण्यात आली आहे.

### दोनच वर्षांत त्यांनी चांगली प्रगती

सेंथिल बालाजी व्यतिरिक्त द्रमुकच्या तीन नेत्यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे. डॉ. गोवी. चेझियान, थिरू आर. राजेंद्रन आणि थिरू एस.एम.नासर यांचा समावेश झाला आहे. सेंथिल बालाजी यांना गेल्यावर्षी जून महिन्यात सक्तवसुली संचालनालयाने अटक केली होती. यावर्षी फेब्रुवारीमध्ये त्यांनी तामिळनाडूच्या मंत्रिमंडळाचा राजीनामादिला होता. महत्वाचं म्हणजे उदयनिधी सध्या तामिळनाडूचे युवक कल्याण आणि क्रीडा विकास मंत्री आहेत.उदयनिधी हे अभिनेते आणि निर्माते असून ते २०२२ मध्ये पहिल्यांदाच आमदार बनले आहेत. पहिल्यांदाच आमदार झाल्यानंतर त्यांना पहिल्या टर्ममध्ये मंत्रिमंडळात संधी मिळाली. मंत्रिमंडळात त्यांना क्रीडा आणि युवा विकास मंत्री हे खातं मिळालं होतं. दोनच वर्षांत त्यांनी चांगली प्रगती साधली.

---

# अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्या अडचणीत वाढ

## निवडणूक रोख्यांच्या योजनेशी संबंधित तक्रारीच्या संदर्भात गुन्हा

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**बेंगळुरू पोलिसांनी शनिवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण, अंमलबजावणी संचालनालय (ED) अधिकारी आणि काही भाजपा नेत्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. रद्द केलेल्या निवडणूक रोख्यांच्या योजनेशी संबंधित तक्रारीच्या संदर्भात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**



विशेष न्यायालयाच्या निर्देशानुसार कलम ३८४ (खंडणीसाठी शिक्षा) आणि १२०बी (गुन्हेगारी कट) अंतर्गत एफआयआर नोंदवण्यात आला. 'जनाधिकार संघर्ष परिषद' (JSP) चे सह-अध्यक्ष आदर्श आर अय्यर यांनी दाखल केलेल्या तक्रारीत कर्नाटक भाजपाचे प्रमुख आणि बी एस येडियुरप्पा यांचा मुलगा बी वाय विजयेंद्र आणि पक्षाचे नेते नलिंकुमार कटील यांचाही समावेश आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार तक्रारदाराने आरोप केला आहे की, "आरोपींनी निवडणूक रोख्यांच्या नावाखाली खंडणी उकळली आणि आठ हजारांहून अधिक कोटी रुपयांचा फायदा करून घेतला."जनाधिकार संघर्ष परिषदेचे (JSP) आदर्श अय्यर यांनी अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्याविरोधात बेंगळुरूमध्ये तक्रार दाखल केली होती. तसेच निर्मला सीतारमण यांच्याविरोधात कारवाई करण्याची मागणी केली होती.

### इलेक्टोरल बाँड म्हणजे काय?

ही योजना सरकारने २९ जानेवारी २०१८ रोजी कायदेशीररीत्या लागू केली. या निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून राजकीय पक्षांना निधी दिला जात होता. राजकीय पक्षांना निधी देण्यात येणाऱ्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता सुधारण्याचे उद्दिष्ट यामागे होते असं सांगितलं जातं. मात्र, यावरून देशभरातून प्रचंड टीका झाली आणि पुढे सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखे योजना रद्द केली. दरम्यान, याच निवडणूक रोखे योजनेच्या माध्यमातून वसुलीच्या आरोपावरून आता निर्मला सीतारमण यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

# अभिनेते मानेंनी शिवबंधन बांधत केला ठाकरे गटात प्रवेश

आगामी निवडणुकांच्या दृष्टीकोनातून राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला आहे. पक्षप्रवेशही मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत, यामुळे राजकीय पक्षांना बळ मिळताना दिसत आहे. आज माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री या निवासस्थानी प्रसिद्ध मराठी अभिनेते किरण माने आणि बीडमधील काही कार्यकर्त्यांचा ठाकरे गटात प्रवेश झाला. उद्धव ठाकरे यांनी या सर्वांना शिवबंधन बांधून त्यांना ठाकरे गटात प्रवेश दिला. दरम्यान, यावेळी कार्यकर्त्यांनी आपलं मनोगत व्यक्त करताना आपल्या घरात आल्यासारखं वाटतंय. पूर्वी शिवसैनिक होतो, आजही शिवसैनिक आहे, अशी भावना कार्यकर्त्यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी ठाकरे गटाचे महत्त्वाचे नेतेही उपस्थित होते. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटाला पुन्हा शिवसेनेत प्रवेश देणार नसल्याची घोषणा केली. किरण माने यांनी आजवर मराठी नाटक, सिनेमे, मालिकाविश्वात अभिनय केलाय. ते बिग बॉस मराठी ४ मध्ये सहभागी होते. याशिवाय मुलगी झाली हो, सिंधूताई माझी माई या मालिकांमध्ये त्यांना काम केलंय. किरण माने यांनी परफेक्ट मिसमॅच, उलट सुलट या नाटकांमध्ये अभिनय केलाय. किरण माने आता अभिनय क्षेत्र गाजवून राजकीय क्षेत्रात कशी वाटचाल करणार, याची सर्वांना उत्सुकता आहे. यावेळी बोलताना किरण माने म्हणाले,"शिवसेना सर्वसामान्यांची आहे. राजकारण गढूळ झालेलं असताना एकटा माणूस लढत आहे. त्यामुळे मी एक संवेदनशील अभिनेता म्हणून माणूस म्हणून सोबत येण्याचा निर्णय घेतला आहे". "संविधान वाचवण्यासाठी मी पक्षामार्फत काम करेल.

# विजयपेक्षा कतरिनानं घेतलं जास्त मानधन!

बॉलिवूड अभिनेत्री कतरिना कैफ आणि टॉलिवूड अभिनेता विजय सेतुपती हे सध्या त्यांच्या आगामी सिनेमामुळे चर्चेत आहेत. कतरिना आणि विजय आता 'मेरी ख्रिसमस' या चित्रपटामध्ये दिसणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. सध्या हे दोन्ही स्टार्स चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहेत. या चित्रपटातून पहिल्यांदाच कतरिना आणि विजयची जोडी पहिल्यांदाच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. या जोडीला मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. हा एक हा क्राईम-थ्रिलर चित्रपट आहे. हा सिनेमा 12 जानेवारीला प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी येणार आहे. आता या चित्रपटासाठी कोणत्या कलाकाराने किती फी घेतली याबद्दल चर्चा सुरु आहे तर आता या चित्रपटासाठी स्टार्सने किती फी घेतली यावर नजर टाकूया. 'मेरी ख्रिसमस'मध्ये कतरिना कैफ मुख्य भूमिकेत आहे. या चित्रपटात कतरिना मारियाची भूमिका साकारत आहे. या चित्रपटात तिची विजयसोबत जोडी जमणार आहे. ती विजयसोबत रोमान्स करतानाही दिसली आहे. कतरिनाने या चित्रपटासाठी सर्वात जास्त मानधन घेतले आहे. तिने या चित्रपटासाठी 15 कोटी रुपये घेतले आहेत. 'मेरी ख्रिसमस' या क्राइम थ्रिलर चित्रपटात विजय सेतुपती वेगळ्या धाटणीची भूमिका करताना दिसणार आहे. आता विजय या चित्रपटात नेमकी कोणती भूमिका साकारतोय याबाबत माहिती समोर आलेली नाही.

# बिपाशा कमवते करोडो रुपये



आज चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व बिपाशा बसू यांचा वाढदिवस आहे. बॉलिवूडची ही ब्युटी क्वीन अनेकदा तिच्या लूक आणि स्टाइलमुळे चर्चेत असते. बिपाशा बसूने 2016 मध्ये टीव्ही मालिकेत आपली छाप पाडणाऱ्या करण सिंग ग्रोवरसोबत लग्न केले. बिपाशा आणि करणची गणना खूप श्रीमंत जोडप्यांमध्ये केली जाते. बिपाशाने चित्रपटांच्या दुनियेत खूप नाव कमावले आहे पण तुम्हाला माहिती आहे का या अभिनेत्रीची एकूण संपत्ती किती आहे? त्याच्या एकूण संपत्तीबद्दल जाणून घेऊया. बिपाशा बसू मुख्यतः तिच्या चित्रपट आणि जाहिरातींमधून मोठी कमाई करते. बिपाशा तिच्या प्रत्येक चित्रपटासाठी करोडो रुपये मानधन घेते. बिपाशा बसूची एकूण संपत्ती 15 मिलियन डॉलर म्हणजेच जवळपास 113 कोटी रुपये आहे. यासोबतच बिपाशा बसूचे मुंबई (वांद्रे) येथे 16 कोटी रुपयांचे आलिशान घर आहे, ज्यामध्ये ती तिच्या पतीसोबत आनंदी जीवन जगत आहे. जर तिच्या कार कलेक्शनबद्दल सांगायचं झालं तर, बिपाशाकडे ऑडी क्यू, 25 लाख किमतीच्या फोक्सवॅगन बीटल आणि 28 लाख किमतीच्या टोयोटा फॉर्च्युनर सारख्या आलिशान कार आहेत. आज चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व बिपाशा बसू यांचा वाढदिवस आहे. बॉलिवूडची ही ब्युटी क्वीन अनेकदा तिच्या लूक आणि स्टाइलमुळे चर्चेत असते. बिपाशा बसूने 2016 मध्ये टीव्ही मालिकेत आपली छाप पाडणाऱ्या करण सिंग ग्रोवरसोबत लग्न केले. बिपाशा आणि

# विघ्नेश शिवनचा आगामी प्रोजेक्ट वादात अडकला



चित्रपट निर्माते विघ्नेश शिवन यांचा चित्रपट LIC (लव्ह इन्शुरन्स कॉर्पोरेशन) ला विमा कंपनी लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया कडून शीर्षक वापरल्याबद्दल नोटीस मिळाली आहे. नुकत्याच आलेल्या एका अहवालात हा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे विघ्नेश शिवन यांचा LIC प्रदर्शनाआधीच वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. अहवालानुसार नोटीसमध्ये म्हटले आहे की, विमा कंपनीने चित्रपटाच्या टीमच्या नावाला विरोध केलाय. पुढील सात दिवसांत निर्मात्यांनी चित्रपटाचे नाव न बदलल्यास त्यांना कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागू शकते, असेही या नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. सध्या तरी विघ्नेश आणि टीमने या अहवालावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. लव्ह इन्शुरन्स कॉर्पोरेशनमध्ये अभिनेता आणि चित्रपट निर्माते प्रदीप रंगनाथन आणि क्रिती शेट्टी मुख्य भूमिकेत आहेत. या चित्रपटात एसजे सूर्याही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये याची घोषणा करण्यात आली होती. या चित्रपटाची निर्मिती सेव्हन स्क्रीन स्टुडिओ आणि राउडी पिक्चर्स करत आहेत. या चित्रपटाच्या संगीताची धूरा लोकप्रिय संगीतकार अनिरुद्ध रविचंदर सांभाळणार आहे.

# भस्म आरतीमध्ये तल्लीन झाली 'अनुपमा'!



टिव्ही मनोरंजन विश्वातील लोकप्रिय शो म्हणजे 'अनुपमा'. या मालिकेमुळे अभिनेत्री रुपाली गांगुली घराघरात पोहचली. तिला प्रेक्षकांचे प्रचंड प्रेम मिळाले आहे. आज प्रसिद्ध टीव्ही अभिनेत्री रुपाली गांगुली उज्जैन बाबा महाकालच्या भस्म आरतीमध्ये सहभागी झाली होती. आरतीनंतर रुपालीने गर्भगृहात जाऊन महाकालचे आशीर्वाद घेतले. सध्या रुपालीचे फोटो सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत. एएनआयने सोशल मीडियावर रुपालीचे काही व्हिडिओ शेअर केले आहेत. ज्यामध्ये ती भक्तांसह बाबा महाकालच्या भक्तीत तल्लीन झाली. रुपालीने देवाचे आशीर्वाद घेतले आणि त्यांचे आभार मानले. आज सकाळी रूपाली गांगुली भगवान महाकालच्या मंदिरात पोहोचली होती. तिथे तिने 'भस्म आरती'मध्ये भाग घेतला आणि भगवान महाकालचे आशीर्वाद घेतले. याआधीही 2023 मध्ये रुपाली गांगुली उज्जैनला गेली होती. यावेळी मिडियासोबत बोलताना रुपालीने सांगितले की, ती महाकालच्या दर्शनासाठी अनेकदा गेली आहे. त्याच्या आशिर्वादानेच तिला तिच्या क्षेत्रात यश मिळाले आहे. ती महादेवाची मोठी भक्त आहे. अभिनेत्री पुढे म्हणाली की, '2020 मध्ये मी पहिल्यांदा इथे आले आणि इथेच मला 'अनुपमा' या मालिकेत काम करण्याची ऑफर मिळाली. आता मी महादेवाकडे काही मागायला नाही तर त्यांचे आभार मानायला आली आहे.' त्यानंतर रुपालीने इंस्टाग्रामवर स्टोरीमध्ये तिचा एक फोटो शेयर केला ज्यात तिने कॅप्शनमध्ये जय महाकाल असे लिहिले होते. रुपाली गांगुली एक उत्तम अभिनेत्री आणि थिएटर कलाकार आहे. 'अनुपमा' या मालिकेपूर्वी 'सारा भाई वर्सेस सारा भाई' या मालिकेत दिसली होती. आता रुपालीला बरेच लोक अनुपमा या नावाने ओळखतात. टिव्ही मनोरंजन विश्वातील लोकप्रिय शो म्हणजे 'अनुपमा'. या मालिकेमुळे अभिनेत्री रुपाली गांगुली घराघरात पोहचली. तिला प्रेक्षकांचे प्रचंड प्रेम मिळाले आहे. आज प्रसिद्ध टीव्ही अभिनेत्री रुपाली गांगुली उज्जैन बाबा महाकालच्या भस्म आरतीमध्ये सहभागी झाली होती. आरतीनंतर रुपालीने गर्भगृहात जाऊन महाकालचे आशीर्वाद घेतले. सध्या रुपालीचे फोटो सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत. एएनआयने सोशल मीडियावर रुपालीचे काही व्हिडिओ शेअर केले आहेत. ज्यामध्ये ती भक्तांसह बाबा महाकालच्या भक्तीत तल्लीन झाली. रुपालीने देवाचे आशीर्वाद घेतले आणि त्यांचे आभार मानले. आज सकाळी रूपाली गांगुली भगवान महाकालच्या मंदिरात पोहोचली होती. तिथे तिने 'भस्म आरती'मध्ये भाग घेतला आणि भगवान महाकालचे आशीर्वाद घेतले. याआधीही 2023 मध्ये रुपाली गांगुली उज्जैनला गेली होती. यावेळी मिडियासोबत बोलताना रुपालीने सांगितले की, ती महाकालच्या दर्शनासाठी अनेकदा गेली आहे.

# मयांक यादव भारतीय संघात

## बांगलादेशविरूद्ध मालिकेसाठी भारतीय संघ जाहीर

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**भारत आणि बांगलादेश यांच्यात ६ ऑक्टोबरपासून टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. संघाची कमान सूर्यकुमार यादव यांच्याकडे आहे. त्याचबरोबर यावेळी नितीश कुमार रेड्डीचाही या मालिकेसाठी संघात निवड करण्यात आली आहे. त्याचा प्रथमच संघात समावेश करण्यात आला आहे. त्याने आयपीएलमध्ये हैदराबादसाठी चमकदार कामगिरी केली होती. याचबरोबर मयंक यादवलाही संघात संधी मिळाली आहे.**




बांगलादेशविरूद्ध टी-२० मालिकेसाठी मयांक यादवचाही संघात समावेश करण्यात आला आहे. आयपीएल 2024 मध्ये अप्रतिम कामगिरी करणाऱ्या मयंक यादवला संघात संधी मिळाली आहे. लखनौ सुपर जायंट्सकडून खेळणाऱ्या मयंकने ताशी १५० किलोमीटरहून अधिक वेगाने चेंडू टाकला आणि आपल्या कामगिरीने सर्वांना प्रभावित करण्यात तो यशस्वी ठरला. दुखापतीमुळे तो बराच काळ मैदानाबाहेर होता, पण त्याने त्याच्या वेगवान गोलंदाजीच्या बळावर भारतीय संघात स्थान मिळवले आहे.कोलकाता नाईट रायडर्सचा मिस्ट्री स्पिनर म्हणून समोर आलेला वरूण चक्रवर्तीला पुन्हा एकदा बारतीय संघात स्थान मिळालं आहे. गेल्या सीझनमध्ये कोलकातासाठी केलेल्या शानदार कामगिरीच्या जोरावर त्याने पुन्हा संधी मिळवली आहे. याचबरोबर जितेश शर्माचेही संघात पुनरागमन झाले आहे. दुसरा यष्टिरक्षक म्हणून त्याचा संघात समावेश करण्यात आला आहे.बांगलादेशविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी ऋषभ पंतला विश्रांती देण्यात आली आहे. भारताला आगामी काळात ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिका खेळायची आहे. याचबरोबर यशस्वी जैस्वाल शुबमन गिल, अक्षर पटेल, कुलदीप यादव मोहम्मद सिराज आणि जसप्रीत बुमराह यांनाही विश्रांती दिली आहे. पुढील कसोटी सामने लक्षात घेता या खेळाडूंच्या वर्कलोड मॅनेजमेंटसाठी विश्रांती देण्यात आली आहे. याशिवाय इशान किशनला पुन्हा संधी मिळालेली नाही. त्याने अलीकडेच देशांतर्गत क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी केली होती. तर रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा यांनी टी-२० प्रकारातून विश्रांती घेतली आहे. बांगलादेशविरूद्ध सामन्यात अभिषेक शर्माबरोबर सलामीला कोण उतरणार यावर सर्वांच्या नजरा असणार आहेत. ऋतुराज गायकवाडला या संघात संधी मिळाली नाही, नुकत्याच होणाऱ्या इराणी कपसाठी रेस्ट ऑफ इंडिया संघाचा कर्णधारही आहे.सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, रिंकू सिंग, हार्दिक पंड्या, रियान पराग, नितीश कुमार रेड्डी, शिवम दुबे, वॉशिंग्टन सुंदर, रवी बिश्नोई, वरुण चक्रवर्ती, जितेश शर्मा, अर्शदीप सिंग, हर्षित राणा आणि मयांक यादव.भारत आणि बांगलादेश यांच्यात ६ ऑक्टोबरपासून टी-२० मालिका खेळवली जाणार आहे.

या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. संघाची कमान सूर्यकुमार यादव यांच्याकडे आहे. त्याचबरोबर यावेळी नितीश कुमार रेड्डीचाही या मालिकेसाठी संघात निवड करण्यात आली आहे. त्याचा प्रथमच संघात समावेश करण्यात आला आहे. त्याने आयपीएलमध्ये हैदराबादसाठी चमकदार कामगिरी केली होती. याचबरोबर मयंक यादवलाही संघात संधी मिळाली आहे. बांगलादेशविरूद्ध टी-२० मालिकेसाठी मयांक यादवचाही संघात समावेश करण्यात आला आहे. आयपीएल 2024 मध्ये अप्रतिम कामगिरी करणाऱ्या मयंक यादवला संघात संधी मिळाली आहे. लखनौ सुपर जायंट्सकडून खेळणाऱ्या मयंकने ताशी १५० किलोमीटरहून अधिक वेगाने चेंडू टाकला आणि आपल्या कामगिरीने सर्वांना प्रभावित करण्यात तो यशस्वी ठरला. दुखापतीमुळे तो बराच काळ मैदानाबाहेर होता, पण त्याने त्याच्या वेगवान गोलंदाजीच्या बळावर भारतीय संघात स्थान मिळवले आहे.कोलकाता नाईट रायडर्सचा मिस्ट्री स्पिनर म्हणून समोर आलेला वरूण चक्रवर्तीला पुन्हा एकदा बारतीय संघात स्थान मिळालं आहे. याशिवाय इशान किशनला पुन्हा संधी मिळालेली नाही. त्याने अलीकडेच देशांतर्गत क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी केली होती. तर रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा यांनी टी-२० प्रकारातून विश्रांती घेतली आहे.

### ऋतुराजला संधी मिळाली नाही

बांगलादेशविरूद्ध सामन्यात अभिषेक शर्माबरोबर सलामीला कोण उतरणार यावर सर्वांच्या नजरा असणार आहेत. ऋतुराज गायकवाडला या संघात संधी मिळाली नाही, नुकत्याच होणाऱ्या इराणी कपसाठी रेस्ट ऑफ इंडिया संघाचा कर्णधारही आहे. सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, रिंकू सिंग, हार्दिक पंड्या, रियान पराग, नितीश कुमार रेड्डी, शिवम दुबे, वॉशिंग्टन सुंदर, रवी बिश्नोई, वरुण चक्रवर्ती, जितेश शर्मा, अर्शदीप सिंग, हर्षित राणा आणि मयंक यादव.भारत आणि बांगलादेश यांच्यात ६ ऑक्टोबरपासून टी-२० मालिका खेळवली जाणार आहे.

# कसोटी मालिकेपूर्वी ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का

## एकदिवसीय मालिका सुरू असताना कॅमेरून ग्रीन जखमी

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात २२ नोव्हेंबरपासून पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे, ज्याला बॉर्डर-गावसकर ट्रॉफी म्हणूनही ओळखले जाते. भारतीय संघाने २०१४/१५ पासून, सलग चार बॉर्डर-गावसकर ट्रॉफी जिंकल्या आहेत. यावेळीही भारतीय संघ विजयाचा प्रबळ दावेदार आहे. आता या मालिकेपूर्वीच ऑस्ट्रेलियन संघासाठी एक वाईट बातमी समोर आली आहे.**




संघाचा स्टार अष्टपैलू खेळाडू कॅमेरून ग्रीन दुखापतग्रस्त झाला असून त्याचे भारताविरुद्ध कसोटी मालिका खेळणे साशंक आहे.ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात एकदिवसीय मालिका सुरू असताना कॅमेरून ग्रीन जखमी झाला. ईएसपीएन क्रिकइन्फोच्या वृत्तानुसार, दुखापतीमुळे तो सध्याच्या इंग्लंड दौऱ्यातून बाहेर पडला आहे. त्याने या मालिकेतील पहिला आणि तिसरा एकदिवसीय सामना खेळला. तो चौथ्या आणि पाचव्या सामन्यातून बाहेर आहे. चेस्टर-ले-स्ट्रीट येथील तिसऱ्या सामन्यानंतर ग्रीनने वेदना होत असल्याचे सांगितले, जिथे त्याने ४५ धावा केल्या आणि सामन्यात दोन विकेट्स घेतल्या होत्या. प्राथमिक स्कॅनमध्ये त्याच्या पाठीला दुखापत झाल्याचे समोर आले आहे. अष्टपैलू खेळाडू पर्थला परतल्यावर दुखापतीची संपूर्ण तीव्रता कळेल, असे क्रिकेट ऑस्ट्रेलियाने म्हटले आहे.ऑस्ट्रेलियाचा इंग्लंड दौरा आतापर्यंत निराशाजनक राहिला आहे. नॅथन एलिस, झेवियर बार्टलेट, रिले मेरेडिथ आणि बेन ड्वारशुइसनंतर ग्रीन हा जखमी झालेला पाचवा खेळाडू आहे.

### ऑस्ट्रेलियाने भारताचा पराभव केला

ऑस्ट्रेलियाला भारतीय संघाविरुद्ध नोव्हेंबरमध्ये कसोटी मालिका खेळायची असली, तरी त्याआधी ग्रीनच्या दुखापतीमुळे संघ व्यवस्थापनाची चिंता नक्कीच वाढली आहे. तो उत्कृष्ट फलंदाजी करतो. नोव्हेंबरमध्ये होणारी मालिका भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांसाठी खूप महत्त्वाची आहे. या दोन संघांमध्ये शेवटच्या चक्रातील अंतिम सामना झाला होता, ज्यामध्ये ऑस्ट्रेलियाने भारताचा पराभव केला होता.